## आध्यात्मिक गुरू गौरांग दास यांचे प्रतिपादन; आयआयएममध्ये मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

# आधुनिक शिक्षण आणि सनातन शिक्षण पद्धतीमध्ये समन्वय हवा

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**नागपूर :** आधुनिक शिक्षण पद्धती ही जगातील बाह्य शक्तींवर विजय मिळवण्याचे ज्ञान देते. त्यासाठी ती सक्षम आहे. मात्र, आंतरिक युद्धावर विजय मिळवायचे असेल तर आधुनिक शिक्षण पद्धती आणि सनातन शिक्षण पद्धतीमध्ये समन्वय साधणे आवश्यक आहे. प्रत्येक धर्मग्रंथांमध्ये आंतरिक शांतीचा संदेश दिला असून त्याचे शिक्षण देणे आवश्यक असल्याचे आवाहन आध्यात्मिक गुरू गौरांग दास यांनी केले.



भारतीय व्यवस्थापन संस्था नागपूर येथे (आयआयएम) गौरांग दास यांच्या मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त प्रसार माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी शैक्षणिक आणि आध्यात्मिक विषयांवर चर्चा केली. दास म्हणाले की, आपल्या देशात मंदिरांची आवश्यकता काय, असा प्रश्न नेहमीच केला जातो. किंवा मंदिरांवरून अनेकदा वादही निर्माण होतो. भारतात आज २० लाख मंदिरे आहेत. ही मंदिरे मानसिक आरोग्य सुधारण्याचे फार मोठे काम करतात. शरीर, मन आणि आत्मा या तिघांचा मेळ घालण्याचे काम मंदिरे करत आहेत. आज एकट्या भारतात ३७० लोक प्रति दिवशी आत्महत्या करतात. भारतीय सैन्य दलही यातून आज सुटले नाही. या सगळ्यांच्या मुळाशी गेल्यास आमची आधुनिक शिक्षा पद्धती आम्हाला बाह्य गोष्टींची लढण्याचे धडे देते मात्र आंतरिक युद्धावर विजय मिळवण्याचे शिक्षण देणेच बंद झाले. परिणामी, आत्महत्येसारख्या घटना घडत आहेत. त्यामुळे आजच्या आधुनिक शिक्षणाला आता सनातन शिक्षण पद्धतीची जोड देणे आवश्यक आहे. भारताने नवीन शिक्षण धोरण स्वीकारले असून यामध्ये आध्यात्मिक शिक्षणाला भर दिला ही आनंदाची बाब असल्याचेही ते म्हणाले. हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन सगळ्याच धर्मांनी आध्यात्मिक शिक्षणावर भर दिला आहे. सर्वच धर्मग्रंथांमध्ये मनशांतीचा मार्ग सांगितला आहे. अशा शिक्षणाची आज विद्यार्थ्यांना नितांत आवश्यकता आहे असेही गौरांग दास म्हणाले. यावेळी आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मेत्री उपस्थित होते.

## धार्मिक शिक्षणातूनच आंतरिक ऊर्जा

भारतात १८५० मध्ये ७ लाख गुरुकुल होते. मात्र, ब्रिटिश आल्यावर आपल्या शिक्षण पद्धतीमध्ये बदल झाला. परिणामी, शाळा आणि कालानुरूप घराण्यातून मिळणारे धार्मिक शिक्षणही बंद झाले. धर्मनिरपेक्ष देश असल्याने धार्मिक शिक्षणाची आवश्यकता काय? असाही प्रश्न उपस्थित होतो. मात्र, दैनंदिन जीवनात, समाजात परिवर्तन घडवायचे असेल, आंतरिक शांती हवी असेल तर धार्मिक शिक्षणच आंतरिक ऊर्जा निर्माण करू शकेल, असेही गौरांग दास यांनी सांगितले.